Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R. No. 832-A, Final Pl No. 178, 179, Near Bal[illegible], Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune 411004

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.नं.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

E-mail secretary.stateboard@gmail.com
Tel. Chairman (p) : STD. (020)-25651751 EPABX -25705000 Secretary(P) : STD. (020)- 25651750

क्र.रा.म./परीक्षा-३/८९७
पुणे-४११००४
दिनांक -१७/०२/२०२२.

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय: कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोजित माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा मार्च-एप्रिल २०२२ च्या प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात

संदर्भ: १) या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-२/४६४, दि.२५/०१/२०२२
२) या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-२/६०४, दि.०३/०२/२०२२
३) या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-३/६३५, दि.०८/०२/२०२२
४) या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-३/६३६, दि.०८/०२/२०२२
५) या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-२/७२१, दि.११/०२/२०२२

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्रांस अनुसरुन कळविण्यात येते की, मार्च-एप्रिल २०२२ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेतील प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांची नियुक्ती माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या स्तरावर करणेबाबत तसेच त्याबाबतचे नेमणूक आदेश शाळा/कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर देणेबाबत संदर्भ क्र. ५ मधील पत्रान्वये सूचित केले आहे.

संदर्भ क्र.१ व २ मधील पत्रांसोबत इ.१२ वी व इ.१० वीच्या प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात मार्गदर्शक सूचना व विषयनिहाय सुधारित नियोजन पाठविण्यात आलेले आहे. त्यामध्ये कळविल्याप्रमाणे इ.१२ वीच्या एनएसक्यूएफ अंतर्गत E3, E5, E6, F6, F8 व G1 ते G6, G8, G9 या व इ.१० वीच्या X1 ते X4, X6 ते X9 व 95, 97, 98 या व्यवसाय शिक्षण विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी बहिस्थ परिक्षक सेक्टर स्किलमार्फत नियुक्त केले जातील तथापि या विषयांचे अंतर्गत परीक्षकांच्या नियुक्तीबाबत संदर्भ क्र.५ मधील पत्राप्रमाणे शाळा/कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

तसेच इ.१० वीच्या X1, 91, 92 व 93 या विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी बहिस्थ परीक्षक व्यवसाय शिक्षण संचालनालयामार्फत (MSCVT) नियुक्त केले जातील तथापि या विषयांचे अंतर्गत

परीक्षकांच्या नियुक्तीबाबत संदर्भ क्र.५ मधील पत्राप्रमाणे शाळा/कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

अन्य विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत व बहिःस्थ परीक्षकांच्या नियुक्तीबाबत संदर्भ क्र.५ मधील पत्राप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

महत्वाचे : मंडळाने निर्धारित केलेल्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन इ. परीक्षा निर्धारित कालावधीत विद्यार्थी कोरोनाबाधित झाल्यामुळे अथवा अन्य वैद्यकीय/अपरिहार्य कारणांमुळे देवू न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची सदर परीक्षा लेखी परीक्षेनंतर घेणेबाबत इ.१०वी व इ.१२वी च्या मार्गदर्शक सूचना व विषयनिहाय सुधारित नियोजनात सूचित केलेले आहे. सदर परीक्षा Out of turn साठी निर्धारित केलेल्या केंद्रांवर न घेता संबंधित विद्यार्थ्यांच्या शाळा, उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातच घेण्यात यावी.

(डॉ. अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे.

---

क्र.मुंविम/प्रात्यक्षिक/३०४/
वाशी, नवी मुंबई-४००७०३
दिनांक:21/02/2022

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,
मुंबई विभागीय मंडळाच्या कर्यक्षेत्रातील सर्व
मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय.

उपरोक्त पत्रानुसार प्राचार्य/मुख्याध्यापकांनी आपल्या स्तरावर नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(डॉ. सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई-४००७०३